आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मनमाड-धुळे-इंदूर रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी, ५ वर्षात पूर्ण करण्याचे सरकारचे उद्दिष्ट
- शेतीमध्ये नवतंत्रज्ञान आणणं, कृषी शिक्षण, कृषी विज्ञान केंद्रांच्या आधुनिकीकरणासाठी सुमारे १४ हजार कोटी रुपयांच्या ७ योजनांनाही केंद्र सरकारची मान्यता
- कार्यप्रणालीत बदल करुन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं वारणानगरमधून सहकारी संस्थांना आवाहन
- पॅरिस पॅरालम्पिकमध्ये नितेश कुमारला सुवर्ण, तर योगेश कथुनिया याला रौप्य पदक

**आणि**

- राज्यात विविध ठिकाणी झालेल्या पावसात ४ जणांचा मृत्यू, १७ जण जखमी

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं आज बहुप्रतिक्षित मनमाड-धुळे-इंदूर रेल्वेमार्गाला मंजुरी दिली. या ३०९ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गासाठी १८ हजार ३६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. येत्या ५ वर्षात हा प्रकल्प पूर्ण होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची आज बैठक झाली. महाराष्ट्रतले २ आणि मध्यप्रदेशातले ४ जिल्हे यातून जोडले जाणार आहे. या मार्गावर ३० रेल्वे स्थानकं असतील, यामुळं १ हजार गावांना आणि ३० लाख नागरिकांना याचा फायदा होईल, असं वैष्णव म्हणाले. यामुळं उत्तर महाराष्ट्रातल्या कांदा उत्पादक जिल्ह्यांना आणि मध्यप्रदेशातल्या भरड धान्य उत्पादन जिल्ह्यांना फायदा होईल, असं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं. या रेल्वेमार्गासाठी पावसाळी अधिवेशनात रेल्वेमंत्र्यांना पत्र

दिलं होतं. आता याला मंजुरी मिळाल्याबद्दल धुळ्याच्या खासदार शोभा बच्छाव यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. धुळेकर नागरिकही या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त करत आहेत.

शेतकऱ्यांसाठीच्या १३ हजार ९६६ कोटी रुपयांच्या ७ योजनांनाही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. त्यात डिजिटल कृषी मिशन, कृषी विज्ञानाद्वारे खाद्य आणि पोषणमूल्य जतनाचा समावेश आहे. यामुळं कृषी क्षेत्रात अनेक नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. कृषी क्षेत्रातलं शिक्षण व्यवस्था बळकट कार्यासाठी २ हजार कोटींहून अधिक रकमेच्या निधीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

जनावरांचं प्रजनन आणि आरोग्य, फलोत्पादन, कृषी विज्ञान केंद्राचं आधुनिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनासाठीच्या विविध योजनांना मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली.

मंत्रीमंडळांना आज गुजरातमधल्या साणंदमध्ये एक सेमीकंडक्टर प्रकल्प उभा करायलाही मंजुरी दिली.

**<><><><><>**

सहकारी संस्थांनी कार्यप्रणालीत बदल करावे, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. कोल्हापूरच्या वारणानगर इथं श्री वारणा महिला सहकारी गटाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. श्री वारणा महिला सहकारी विविध उद्योग समूहाचा सुवर्ण महोत्सवी सोहळा आणि वारणा विद्यापीठाचं उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. सहकार क्षेत्राच्या संपूर्ण क्षमतेचा वापर अद्याप झालेला नाही. या संस्थांनी व्यवस्थापनात अचूकता आणावी, यासाठी अधिकाधिक युवांना या क्षेत्राशी जोडून घ्यावं, असं त्यांनी सुचवलं._महिला हा समाजाचा महत्त्वाचा भाग असून त्यांची उपेक्षा करून समाजाचा विकास साधता येत नाही, असं राष्ट्रपती म्हणाल्या.

विकासात जोवर महिलांची भागिदारी वाढणार नाही तोवर विकास होणार नाही हे सहा दशकांपूर्वी तात्यासाहेब कोरे यांनी जाणले होते. त्यांना पद्म पुरस्कार मिळाला पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

वारणा आणि परिसरातली नवी पीढी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सन्मानाचं स्थान निर्माण करेल अशी ग्वाही विनय कोरे यांनी यावेळी दिली.

यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पालकमंत्री हसन मुश्री यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

२०२३ मधल्या खरीप हंगामादरम्यान कापूस आणि सोयाबीनची लागवड केलेल्या शेतकऱ्यांकरता  राज्य शासनानं सुमारे ४ हजार १९४ कोटी रुपये अर्थसहाय्य मंजूर केलं आहे. हे अर्थसाह्य शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार असून या वर्गवारीची सुरुवात १० सप्टेंबरपासून केली जाणार आहे, अशी माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत आजपर्यंत राज्यात १ लाख १० हजार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षासाठी रुजु होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यापैकी ६० हजाराहून अधिक युवा राज्यातील खाजगी तसेच शासकीय संस्थांमधे प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज दिली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताला आज एक सुवर्ण आणि एक रौप्य पदक मिळालं. बॅडमिंटनपटू नीतेश कुमार यानं ब्रिटनच्या डॅनिएल बेथेल याचा २१-१४, १८-२१, २३-२१ असा पराभव करून सुवर्णपदकावर नाव कोरलं आणि भारताची पदकसंख्या नऊवर नेली. तत्पूर्वी भालाफेकपटू योगेश कथुनिया यानं रौप्यपदक पटकावलं.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात पावसानं जोर धरला आहे. मराठवाड्यात हिंगोली, जालना आणि परभणीत काल रात्री जोरदार पाऊस झाला आहे. अतिवृष्टीत ४ लोकांना प्राण गमवावे लागले असून, १७ जण जखमी झाले आहेत. ८८ जनावरं या अतिवृष्टीत दगावली आहेत. १६० कच्च्या घरांची पडझड झाली आहे. मराठवाड्यातल्या विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आढावा घेतला असून, शेतीसह इतरही नुकसानीचे तत्काळ पंचनामे करुन प्रशासनानं त्वरित मदत करावी, असेही निर्देश दिले आहेत.

**नांदेड** जिल्ह्यात एसडीआरएफचं पथक तैनात केलं आहे. जायकवाडी धरण हे ८८ टक्के भरले आहे. संततधार पावसामुळे विष्णुपुरी धरणाचे ११ दरवाजे उघडले आहेत.

**जालना** जिल्ह्यात घडसावंगी तालुक्यात एका शेतकऱ्याचा बुडून मृत्यू झाला. अंबड तालुक्यात शिराढोण वाडी इथं पावसामुळे घराची भिंत कोसळून ३ जण गंभीररीत्या जखमी झाले, तर एकाला किरकोळ दुखापत झाली.

**परभणी** जिल्ह्यात करापरा नदीला पूर आल्यानं जिंतूर तालुक्यातल्या अनेक गावांना पुराचा वेढा बसला आहे. परभणी - जिंतूर महामार्गावरची वाहतूक बंद झाली आहे. सेलू इथं पूरस्थिती हाताळण्यासाठी लष्कराला पाचारण केलं आहे. ६० सैनिक आणि वैद्यकीय पथकं बचावकार्य करत आहेत. गोदावरी नदीकाठच्या रहिवाशांना सावधानतेचा इशारा जिल्हा प्रशासनानं दिला आहे.

**हिंगोली** जिल्ह्यात कयाधू नदीला महापूर आला आहे. यामध्ये १० ते १५ गावांतल्या शेतांमध्ये पुराचं पाणी घुसल्यानं शेतात राहणारे मजूर अडकले आहेत. कळमनुरी तालुक्यातल्या देवजना गावातल्या शिवारात १५ ते २० मजूर पुराच्या पाण्यात अडकले आहेत. वसमत ते उमरा फाटा मार्गावर कयाधू नदीवरच्या पुलाचा काही भाग तुटल्यानं या मार्गावरची वाहतूक बाधित झाली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं बचावकार्य करत आहेत.

**लातूर** जिल्ह्यातल्या १० पैकी ६ तालुक्यांमधे अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

**बीड** जिल्ह्यात आज सकाळी ९२ मिलीमिटर  इतका पाऊस झाला. एकूण ६२ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून त्यापैकी ३५ महसुली मंडळामध्ये १०० मिलीमिटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.

**सोलापूर** शहर आणि जिल्ह्यात गेले दोन दिवस सातत्यानं पाऊस पडत असून शेतात पाणी शिरलं आहे.

हवामान विभागानं येत्या २४ तासांसाठी **धुळे, नंदुरबार, परभणी, हिंगोली, आणि नांदेड** या जिल्ह्यांमधे रेड अलर्ट दिला आहे. **जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अकोला आणि यवतमाळ** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><><>**

बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आज राज्यभरात बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला.

या सणाचा एक भाग म्हणून परभणीच्या  विविध भागातल्या बैलांना सजवण्यात आलं होतं. त्यांची पूजा करून तसंच नै◌ेवद्य दाखवून त्यांची  वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली होती.

**हिंगोली** जिल्ह्यातही भर पावसात बैलांना रंगरंगोटी करून, त्यांची पूजा करण्यात आली.

सध्याच्या आधुनिक यंत्रयुगात बैलांची संख्या रोडावल्यामुळं **बुलढाणा** जिल्ह्यात आज बैलपोळ्याऐवजी ट्रॅक्टर पोळा साजरा करण्यात आला. या प्रसंगी सुमारे १५०-२०० ट्रॅक्टरांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती.

**<><><><><>**

जेजुरीमध्ये आज सोमवती अमावस्येनिमित्त भरलेल्या खंडोबा यात्रेत राज्यभरातून लाखो भाविक आले होते. दुपारी १ वाजता पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी मार्गस्थ झाला. यानंतर बंदुकीच्या फैरी झाडत सोहळ्याला सलामी देण्यात आली.

**<><><><><>**

स्मिता वत्स शर्मा यांनी आज भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक पदाचा कार्यभार स्वीकारला. यापूर्वी त्या अतिरीक्त महासंचालक म्हणून कार्यरत होत्या.